# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅकद्वारे A+दर्जा)

**विद्यार्थी विकास**


संचालक (का.) : २४०३१३२
विद्यार्थी विकास : २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.ac.in
E-Mail : **dsw@bamu.ac.in**

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
(महाराष्ट्र)
**मो. क्र. : ७५८८१६५२२१**


संदर्भ /संविवि/२०२५-२६/36329-36858 दिनांक : ०५.०२.२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

प्रति,
**मा. विभाग प्रमुख,**
सर्व शैक्षणिक विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय : 'छत्रपती संभाजी महाराज करंडक' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा २०२६ बाबत....**
**संदर्भ क्र: मनपा/सांस्कृतिक/२०२६/२३४ दि. ०३.०२.२०२६ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या पत्रानुसार महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने **'छत्रपती संभाजी महाराज करंडक' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा २०२६** चे आयोजन **दि. १६ ते १८ फेब्रुवारी २०२६** रोजी **यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, छत्रपती संभाजीनगर** येथे करण्यात आले आहे.

तरी आपल्या विभाग / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एकांकिका स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, ही विनंती.

धन्यवाद,

**सोबत :** संदर्भीय पत्र व स्पर्धेचे माहितीपत्रक.

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

## महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर

### सांस्कृतिक विभाग

# "छत्रपती संभाजी महाराज करंडक"

# राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा-२०२६

स्पर्धा दिनांक :- १६ ते १८/०२/२०२६ | स्थळ :- यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, छत्रपती संभाजीनगर.

आपणास कळविण्यात येते की, कलाकारांसाठी "छत्रपती संभाजी महाराज करंडक" राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक राज्यात उत्तमोत्तम कलावंत दडलेले आहे. त्यांचा कलाविष्कार घडविणारा, कलागुणांना वाव देणारा, नवनिर्मितीकरणारा, नाविण्यपूर्ण उपक्रम ज्यामुळे सांस्कृतिक क्षेत्राच्या कक्षा रूंदावून नवे पर्व सुरू होण्यास छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सादर करीत आहे. राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आपले हक्काचे रंगमंच.

**राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत खालील प्रमाणे पुरस्कार दिले जातील.**

एकांकिका सांघिक प्रथम पुरस्कार- रू.३१,०००/-

एकांकिका सांघिक द्वितीय पुरस्कार- रू.२१,०००/-

एकांकिका सांघिक तृतीय पुरस्कार- रू.११,०००/-

दोन उत्तेजनार्थ पुरस्कार प्रत्येकी रू.५०००/- प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह,

तसेच सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन, लेखन, पुरूष अभिनय, महिला अभिनय, संगीत, नेपथ्य, प्रकाश योजना, रंगभुषा, वेशभुषा यांचे साठी प्रत्येकी प्रथम- रू.३०००/-, द्वितीय- रू.२०००/-, तृतीय - रू.१०००/-

वरील नऊ अभिनय कला प्रकारासाठी **एकूण पुरस्कारांची रक्कम रूपये १,२७,०००/-**



टिप :-१) स्पर्धा स्थळी दोन तास अगोदर उपस्थित राहावे.
२) स्पर्धकांनी स्वतः सर्व नाट्य साहित्य सोबत आणावे.
३) प्रत्येकी नोंदणी शुल्क रू.५००/- राहील.
आजच आपली नोंदणी करा.

**नोंदणीची अंतिम दि.१३/०२/२०२६**

## स्पर्धा व पुरस्कार वितरण समारंभ

दि. १८/०२/२०२६ रोजी संध्या.६ वा. विजयी स्पर्धकाना पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

**मा. श्री. जी. श्रीकांत,** (भा.प्र.से.) आयुक्त

मा. श्री. लखिचंद चव्हाण, उप आयुक्त -६ | मा. श्रीमती कल्पिता पिंपळे, अतिरिक्त आयुक्त-२

विनीतः- शंभू विश्वासू, सांस्कृतिक कार्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,

प्रवेशिका व अधिक माहितीकरीता संपर्क -मो.९८९००९४०३९

Cont: 8208899835 [illegible]

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## "छत्रपती संभाजी महाराज करंडक" राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा-2026

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने राज्यस्तरीय पातळीवरील खुल्या "छत्रपती संभाजी महाराज करंडक"राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन दिनांक 16/02/2026 ते दिनांक 18/02/2025 या कालावधीत, स्थळ: यशवंतराव चव्हाण नाटयगृह, रॉक्सी सिनेमा जवळ, पैठणगेट येथे करण्यात येत आहे.

**स्पर्धेची नियमावली व अटी-शती खालील प्रमाणे.**

1. या स्पर्धेत महाविद्यालय, विद्यापीठ, विविध संस्था, महानगरपालिका, विज मंडळ कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन कार्यालय, हौशी नाट्य संघ आदी सहभागी होऊ शकतात.
2. एकांकिका स्पर्धेचे माध्यम मराठी असेल.
3. एका संघास एकच प्रवेशिका/एकांकिका सादर करता येईल.
4. एकांकिका कुठल्याही नाटकाचा एखादा अंक असु नये.
5. आक्षेपार्ह लेखन असलेल्या एकांकिका सादर करता येणार नाही. तसेच रंगमंचावर निषिध्द ठरु शकणा-या सादरीकरणावर परीक्षकांनी आक्षेप घेतल्यास एकांकिकेचे सादरीकरण करता येणार नाही व याबद्दल संयोजकाचा व परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांनाच बंधनकारक राहील.
6. सहभागी होऊ इच्छिणा-या संघानी एकांकिकेच्या एका संहिता प्रतीसह व संपूर्ण माहितीसह सोबत जोडलेल्या व प्रवेश अर्जासह लेखकांच्या परवानगी व परिनिक्षण मंडळाचे पत्रासह प्रवेशिका पाठवावी.अपूर्ण व अर्धवट प्रवेशिका रद्द करण्यात येईल.
7. स्पर्धेसाठी नोंदणीशुल्क रक्कम रु.500/- व अनामत रक्कम रु.500/- प्रवेशिके सोबत भरावे लागेल. त्याशिवाय प्रवेशिका स्विकारली जाणार नाही. प्रयोगाच्या ऐनवेळी किंवा स्पर्धेपूर्वी एकांकिका रद्य केल्यास नोंदणीशुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही. स्पर्धकांनी याची नोंद घ्यावी.
8. एकांकिका सादरीकरण करण्याचा कालावधी कमीत-कमी 30 मिनीटांचा व जास्तीत-जास्त 45 मिनीटांचा असावा, त्यापेक्षा जास्त असल्यास स्पर्धेतुन तो संघ बाद करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.
9. दोन एकांकिका च्या सादरीकरणामध्ये फक्त 15 मिनिटांचा अवधी तयारीस्तव दिला जाईल.
10. प्रयोग सादर करण्यापुर्वी एकांकिकेत काम करणा-या सर्व कलाकारांची तंत्रज्ञाची यादी व संहिता तीन प्रतीत संयोजक यांच्याकडे देणे आवश्यक राहील.
11. एकांकिका लेखन नव्याने केले असल्यास सेन्सॉर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
12. ऐनवेळस एकांकिकेत वदल करता येणार नाही.
13. आयोजकाकडून प्रयोग सादरीकरण्याच्या दिवशी एकवेळ जेवण्याची व्यवस्था करण्यात येईल.स्पर्धकांनी सोबत आणलेली सर्व सामानाची जबाबदारी त्यांची स्वता:ची राहील, समान गहाळ झाल्यास आयोजक जबाबदार राहणार नाही.
14. एकांकिका सादरीकरण्याच्या वेळी संघांकडून गैरवर्तन झाल्यास त्या संघास स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

अधिक माहितीसाठी: विजय निकाळजे:-8208899835, हंसराज बन्सवाल:-9422211107, सुनील जैस्वाल:-9890094039.

(शं.वि.दे. विश्वासु)
सांस्कृतिक कार्य अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
(मो.क्र 9764417269)

महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर
सांस्कृतिक विभाग

# "छत्रपती संभाजी महाराज करंडक" राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा-२०२६

दि.१६ ते १८ फेब्रुवारी २०२६ स्थळ :- यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, छत्रपती संभाजीनगर.

प्रति,
**सांस्कृतिक कार्य अधिकारी,**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.
स.न.

आम्ही, आमच्या संस्थेच्या वतीने आपण आयोजित करीत असलेल्या "छत्रपती संभाजी महाराज करंडक" राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत सहभागी होऊ इच्छितो.

संस्थेचे नावः- ____________________

संपर्क पत्ता :- ____________________

मो.क्र. ____________________

एकांकिकेचे नावः- ____________________

दिग्दर्शकाचे नाव :- ____________________

निर्मिती संघ प्रमुख/ व्यवस्थापकाचे नाव :- ____________________ मो. __________

या संदर्भातील माहीतीपत्रक आम्ही वाचले असून, सदर राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे स्वरूप आम्हाला ज्ञात झाले आहे. स्पर्धा सहभागासंबंधीचे नियम व अटी आम्हाला मान्य असून ते आमच्यावर बंधनकारक राहतील.

निकालावर आम्ही आक्षेप घेणार नाही. स्थानिक वा इतर वाहिनींवर आमची एकांकिका प्रदर्शित केल्यास आमचा कोणताही आक्षेप असणार नाही.

सोबत एकांकिकेचे नाव, लेखकाचे परवानगी पत्र, संहीतेची एक प्रत जमा करण्यात येत आहे. तरी आम्हाला राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत सहभागी करून घेण्यात यावे ही, नम्र विनंती.

नोंदणी शुल्क रू. ५००/-केल्याची पावती क्र.------------------दि.--------------------

अनामत रक्कम रू. ५००/-केल्याची पावती क्र.------------------दि.--------------------

आपला

सही
संघ प्रमुखाचे नाव ____________________

---

**प्रवेश शुल्क व प्रवेश पत्र स्विकारण्याचा पत्ताः-**

सांस्कृतिक कार्य अधिकारी, सांस्कृतिक विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका (महा.)

प्रवेशिका स्विकारण्याचा व्हाट्स ॲप नंबर :- मो.९८९००९४०३९

वरील प्रवेश पत्रानुसार संस्थेस/नाट्य संघास प्रवेश देण्यात आला.

लॉट्सनुसार एकांकिका प्रयोगाकरीता निश्चित झालेली तारीख :- /०२/२०२६ अ.क्र. __________

सांस्कृतिक कार्य अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.

संस्थेचे नाव :- ____________________

संस्था पंजिकृत असल्यास क्र. ____________________

एकांकिकेचे नाव :- ____________________

लेखक :- ____________________

दिग्दर्शक :- ____________________

नेपथ्य :- ____________________

प्रकाश योजना :- ____________________

पार्श्वसंगीत :- ____________________

रंगभुषा :- ____________________

वेशभुषा :- ____________________

| | सहभागी कलावंतांचे नाव | लिंग | भूमिका |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |
| ७. | | | |
| ८. | | | |
| ९. | | | |
| १०. | | | |

स्वाक्षरी

नाव :- ____________________

संघ प्रमुख/ व्यवस्थापक

पत्ता :- ____________________

मो.क्र. ____________________

स्वाक्षरी

नाव :- ____________________

दिग्दर्शक

पत्ता :- ____________________

मो.क्र. ____________________